**उपसंचालक, बाष्पके, गट -“अ” पदावर**
**नामनिर्देशनाने नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन आदेश क्रमांकः बाष्पके-०५१४/प्र.क्र.१५/कामगार-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १३ सप्टेंबर, २०१९

**वाचा :**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.४९३/१५२८/पंधरा-अ,दि.२०.०२.२०१९**

**शासन आदेश:**

उपसंचालक, बाष्पके, गट “अ”या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २०.०२.२०१९ च्या पत्रान्वये ७ उमेदवारांची शिफारस केली आहे. त्यानुसार खालील उमेदवारांची उपसंचालक,बाष्पके,गट“अ”या पदावर वेतन मॅट्रीक्स, स्तर क्र. एस-२० (रु.५६१००-१,७७,५००/-) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात परिविक्षाधिन नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | गुणवत्ता क्रमांक | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.सुहास बालासाहेब देशपांडे | खुला | खुला | ०१ | उपसंचालक,बाष्पके,कोल्हापूर |
| २. | श्री. अभिजित यादवराव ठाकरे | इ.मा.व | खुला | ०२ | उपसंचालक,बाष्पके,मुंबई |
| ३. | श्री. नरेश मदन बाहे | इ.मा.व | खुला | ०३ | उपसंचालक,बाष्पके,नाशिक |
| ४. | श्री. इम्रान इब्राहिम मुजावर | इ.मा.व | खुला | ०४ | उपसंचालक,बाष्पके,पुणे |
| ५. | श्री. स्वप्निल अशोक राजुरकर | इ.मा.व | इ.मा.व | ०५ | उपसंचालक,बाष्पके,अहमदनगर |
| ६. | श्री.छगन गोविंद पवार | वि.जा.-अ. | वि.जा.-अ. | ०७ | उपसंचालक,बाष्पके,पुणे |
| ७. | श्री. अभय धनराज खोब्रागडे | अ.जा. | अ.जा. | ११ | उपसंचालक,बाष्पके,मुंबई |

१) उमेदवारांनी या शासन आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसांच्या आत म्हणजेच दि.१३.१०.२०१९ पर्यंत पदस्थापनेच्या पदाचा पदभार स्विकारणे आवश्यक राहील.
२) विहित कालावधीत जे उमेदवार रुजु होणार नाहीत, असे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निश्चित केलेल्या गुणवत्ता यादीतील ज्येष्ठता गमावतील.

३) जे उमेदवार विहित मुदतीत पदस्थापनेच्या पदावर रुजु झाले नसल्यास, तसा अहवाल संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई, यांनी त्यांच्या अभिप्रायासह उचित कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठवावा.

४) उमेदवारांनी त्यांचे पदग्रहण प्रतिवेदन संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत सादर करावेत.

५) सदर उमेदवारांची वैद्यकिय तपासणी, चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी तसेच इतर अनुषंगिक विहित प्रमाणपत्रे व मुळ कागदपत्रांची पडताळणी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन करण्यात आली आहे.

६) नियुक्तीच्या वेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ अन्वये विहित केल्यानुसार या आदेशाच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्या सेवा आपोआप समाप्त होतील.

७) उमेदवारांचा परिविक्षा कालावधी दोन वर्षांचा राहील. सदर परिविक्षा कालावधीमध्ये पहिल्या वर्षानंतरची वेतनवाढ देण्यात यावी आणि त्या पुढील वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच देण्यात यावी.

८) ज्या उमेदवारांनी यापुर्वी मराठी भाषा व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्यांना त्या परिक्षांतुन सुट मिळाली नसेल, तर त्यांना विहित नियमानुसार व विहित कालावधीत मराठी व हिंदी भाषा परिक्षा ही उत्तीर्ण व्हावी लागेल, अन्यथा उक्त भाषा परिक्षा नियमातील तरतुदीनुसार त्यांची वेतनवाढ रोखण्यात येईल.

९) वित्त विभाग,शासन निर्णय क्र. अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४,दि.२७.०८.२०१४ मधील तरतुदीनुसार संबंधित उमेदवारांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू राहील.

१०) ज्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्रांची अद्याप तपासणी करण्यात आलेली नाही. त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र तपासाणीचे पत्र शासनास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहुन त्यांची तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.

११) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने, त्यांच्या दिनांक २०.०२.२०१९ च्या पत्रान्वये शिफारस केलेल्या या उमेदवारांच्या सेवा ज्येष्ठतेचे आदेश प्रचलित नियमानुसार यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

१२) या उमेदवारांनी त्यांच्या कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास आणि/किंवा परिविक्षा कालावधीमध्ये त्यांचे काम किंवा वर्तणुक अयोग्य अथवा अननुरुप आढळल्यास अथवा त्यांनी सादर केलेली कोणतीही माहिती वा कागदपत्रे योग्य नसल्याचे आढळल्यास ते सेवेतुन कमी करण्यास पात्र ठरतील. तसेच त्यांच्या विरुद्ध काही शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रलंबित असल्याचे आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१३) उमेदवारांना सेवेतुन कमी करावयाचे झाल्यास, शासन त्यांना एक महिन्याची पुर्वसुचना देईल. मात्र, त्यांच्या सेवेच्या कालावधीमध्ये दुर्वर्तन व सेवेच्या शर्तीचा भंग झाला तर अशी पुर्वसुचना न देता त्यांना सेवेतून कमी करण्यात येईल. पुर्वसुचनेचा एक महिन्याचा कालावधी शासन वेळोवेळी जे बदल करील त्या बदलांना अधिन राहुन ठरविण्यात येईल.

१४) उमेदवारांना राजीनामा द्यावयाचा असेल तर, त्यांनी शासनाला कमीत कमी एक महिन्याची पुर्वसुचना देणे आवश्यक आहे.

१५) उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमुद केलेल्या अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासन सेवेत असलेल्या अधिकारी वर्गाला लागु असणारे इतर प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय इत्यादी सुद्धा त्यांना लागु राहतील.

१६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३.०९.२०११ मधील नमुद महाराष्ट्र राज्याच्या प्रशिक्षण धोरणानुसार संचालक, बाष्पके संचालनालय,मुंबई यांनी सदर उमेदवारांचे **प्र**शिक्षण आयोजित करण्यात यावे.

१७) उमेदवारांचे गोपनीय अभिलेख योग्य प्राधिका-याकडे **प्रचलित नियमानुसार सादर करण्यात यावेत**.

१८) **उमेदवारांच्या परिविक्षा कालावधीबाबत** संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई यांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक २९/०२/२०१६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात त्यांच्या बाबतचा अहवाल दोन प्रतीमध्ये शासनाकडे पाठवावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३१४५३०९६३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Meghashyam Nawar

Digitally signed by Meghashyam Nawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d2d0d7e2120f3814eff2bd1a5d3c902860ebecbe995c3b2260a01b762f45c3a, serialNumber=a5505efe2f8776471817f30ce3446f37d84d8aeddd35d8e3a76a12d1b08434dd, cn=Meghashyam Nawar
Date: 2019.09.13 14:59:15 +05'30'

**( मेघःश्याम नवार )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति:**

सर्व संबंधित उमेदवार, नोंदणीकृत पोचदेय डाकेने

**प्रत,**

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई

२. मा. राज्यमंत्री(कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई. (पत्राद्वारे)
५. सहसचिव, (कामगार-१) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, बाष्पके संचालनालय,कामगार भवन,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पुर्व), मुंबई-५१
७. बाष्पके संचालनालयाचे सर्व संबंधित प्रमुख
८. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -२, नागपुर
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११.सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
१२.निवडनस्ती कामगार-१.